# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे,

## ४१२, ई, शिवाजीनगर, पुणे, ४११ ०१६.

**फोन नंबर ५६५६२३४, फॅक्स ५६५६२३४**

**अत्यंत महत्वाचे**

जा.क्र.तंशिविकापु/लेखा-३/२०२०/ 799

दिनांक :-१२/०२/२०२०
13 FEB 2020

प्रति,

प्राचार्य/संचालक,
सर्व अशासकीय अनुदानित संस्था
(या कार्यालयाच्या अधिनस्त)

**विषय :-** ५ गंभीर आजारावरील वैदयकीय उपचाराचा खर्च भागविण्यासाठी अग्रीम प्रस्तावासोबत सादर करावयाच्या कागदपत्रांबाबत.

**संदर्भ :-** मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक तंशिसं-६/लेखा/वैदय.अग्रीम/२०२०/१६ दिनांक ०४/०२/२०२०.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधिन पत्रास अनुसरुन कळविण्यात येते की, शासकीय कर्मचा-याला गंभीर आजारावर **(१. हृदय शस्त्रक्रियांची प्रकरणे २. हृदय उपमार्ग शस्त्रक्रिया ३. ॲन्जिओप्लॅस्टी ४. मुत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रिया ५. कर्करोग)** शासकीय/अशासकीय खाजगी रुग्णालयातील वैदयकीय उपचाराचा खर्च भागविण्याकरिता रुपये १,५०,०००/- पर्यंत अग्रीम मिळण्याची तरतुद आहे.सदर तरतुदीस अनुसरुन या कार्यालयामार्फत शासकीय/अशासकीय अनुदानित संस्थातील अधिकारी/ कर्मचारी तसेच त्यांचेवर अवलंबित सदस्य यांच्या गंभीर आजारावर वैदयकीय उपचाराकरिता/शस्त्रक्रियेकरिता तातडीचा खर्च भागविण्याकरिता अग्रीम मिळणेबात प्रस्ताव संचालनालयास सादर करण्यात येतात. सदर प्रस्ताव सादर करताना आवश्यक प्रमाणपत्रांअभावी वेळेत अग्रीम मंजुर करणे शक्य होत नाही.

त्या अनुषंगाने सोबत जोडलेल्या संदर्भांकित पत्राचे अवलोकन करावे आणि वैदयकीय अग्रीम प्रस्ताव सादर करताना किमान २० दिवस अगोदर संबंधित पत्रात नमुद कागदपत्रांसह या कार्यालयास सादर करावे जेणेकरुन पुढील कार्यवाही करणे सुलभ होईल.

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे-१६

सोबत- वरीलप्रमाणे

प्रत- :- प्रोग्रॅमर, यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी – 022-68597454

Email : desk6@dtemaharashtra.gov.in internet :- www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक : तंशिसं-६/लेखा/वैद्य.अग्रीम/२०२०/७६

दिनांक :- 04 FEB 2020

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/नागपूर/अमरावती

विषय :- **५ गंभीर आजारावरील वैद्यकीय उपचाराचा खर्च भागविण्यासाठी अग्रीम प्रस्तावासोबत सादर करावयाच्या कागदपत्रांबाबत**

संदर्भ :- १)सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रमांक : एमएजी २००५/प्र.क्र.२५१/आ.३, दि.१० फेब्रुवारी, २००६

२) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन, शासन परिपत्रक क्र. वैखप-२०१३/ प्र.क्र.२९१/१३/राकावि-२ दि.११ ऑक्टोबर,२०१३

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधिन क्र.१ अन्वये शासकीय कर्मचाऱ्याला गंभीर आजारावर **(१. हृदय शस्त्रक्रियांची प्रकरणे २. हृदय उपमार्ग शस्त्रक्रिया ३. ॲन्जिओप्लॅस्टी शस्त्रक्रिया ४.मूत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रिया ५.कर्करोग)** शासकीय / शासनमान्य खाजगी रुग्णालयातील (संदर्भ क्र.२ नुसार) वैद्यकीय उपचाराचा खर्च भागविण्याकरिता रु.१,५०,०००/- पर्यंत अग्रीम मिळण्याची तरतूद आहे. सदर तरतूदीस अनुसरुन विभागीय कार्यालयामार्फत शासकीय / अशासकीय अनुदानित संस्थांतील अधिकारी / कर्मचारी तसेच त्यांचेवर अवलंबित सदस्य यांच्या गंभीर आजारांवर वैद्यकीय उपचाराकरिता / शस्त्रक्रियेकरिता तातडीचा खर्च भागविण्याकरिता अग्रीम मिळणेबाबत प्रस्ताव संचालनालयास सादर करण्यात येतात. सदर प्रस्ताव सादर करताना आवश्यक प्रमाणपत्रांअभावी वेळेत अग्रीम मंजूर करणे शक्य होत नाही.

तरी वैद्यकीय अग्रीमाकरिता प्रस्तावासोबत संबंधित कर्मचाऱ्याचा अर्ज खालील कागदपत्रांसह (कागदपत्रांवर संबंधित संस्था / कार्यालय प्रमुखाचे साक्षांकन आवश्यक) शस्त्रक्रिया / उपचाराच्या किमान १५ दिवस अगोदर संचालनालयास सादर करण्यात यावा, जेणेकरुन वैद्यकीय अग्रीम वेळेत मंजूर करणेबाबत कार्यवाही करणे सुलभ होईल.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे. 11 FEB 2020 आवक क्र. 9333

\\DTENS1\minister_ppt\desk 6\durgeshnew\newcircular.docx

**वैद्यकीय उपचारासाठी अग्रीमाच्या प्रस्तावासोबत सादर करावयाची कागदपत्रे.**

१)रुग्णालयाचे शस्त्रक्रियेसाठीचे अंदाजपत्रक उपचार करणाऱ्या डॉक्टरांच्या सही शिक्क्यासह. (Estimate)

२) स्थायी कर्मचारी प्रमाणपत्र

३) वैद्यकीय भत्ता दिला जात नसल्याचे प्रमाणपत्र

४) वेतन प्रमाणपत्र

५) कुटुंब मर्यादा प्रमाणपत्र.

६) निवृत्तीवेतन घेत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र (अवलंबित सदस्यांबाबत)

७) रेशनिंग कार्ड / आधार कार्डची साक्षांकित प्रत

८) आकस्मिकता प्रमाणपत्र(उपचार करणाऱ्या डॉक्टरांच्या सही शिक्क्यासह)

९) १००/- रुपयांच्या स्टॅम्पपेपरवर हमीपत्र.

१०)अवलंबिता प्रमाणपत्र (जोडीदाराशिवाय इतर पात्र नातेवाईकांसाठी)

११) शासकीय / निमशासकीय नोकरीत नसल्याचे प्रमाणपत्र(जोडीदाराबाबत)

१२) संस्थेचे शिफारसपत्र

तरी गंभीर आजारांवर वैद्यकीय उपचारासाठी अग्रिमाबाबत प्रस्ताव पाठविताना वरीलप्रमाणे नमूद कागदपत्रांसह सादर करण्याचे आपल्या अधिपत्याखालील सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित संस्थांना आपल्या स्तरावरुन कळविण्यात यावे. सदर पत्र संचालनालयाच्या www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर download section मध्ये उपलब्ध आहे.

(डॉ.अभय वाघ)
**संचालक,**
**तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई.**